म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे.
विषय वा.वा.
दा. क्र. ११५८

# छप्पा पाणी

BVBK-0401157

# छप्पापाणी

उत्तम कोळगावकर



स्वाती व पल्लवी यांना

म. ग्रं. सं. ठाणे, शाखा.
बाल वाङ्मय विभाग.
वा. क्र ..११५७. दिनांक .......
विषय ..बा-क.. क्र....५१६

BVBK-0401157

# अजब राजा

गजबपूरचा
अजब राजा
त्याने केली
काय मजा

लोकांना म्हणाला,
" नाचा खूप
बसू नका
कोणी चूप

नाचता नाचता
गाणं गा
गाता गाता
पेढे खा

पेढे खाऊन
हसा हसा
खुशीत सगळे
दिसा दिसा "




अजब राजाची
अजब बात
त्याने केले
कायदे सात

त्यातला होता
एक असा
प्रत्येकाने
पाळावा ससा

# सात रंगाच्या सात पोरी

सात रंगाच्या सात पोरी
गात गात आल्या

तळ्यात निळ्या बुडाल्या नि
निळ्या निळ्या झाल्या

निळ्या निळ्या पोरी मग
मळ्यात गेल्या तशा

काऊचिऊ पाखरांची
आली त्यांना भाषा



पाखरांच्या राजाने
त्यांना दिले पंख
पऱ्या होऊन पोरी त्या
उडून गेल्या उंच

## खुजोबा

एक होता विचित्र
खुजोबा खुजोबा
आमच्या गल्लीतल्या
गजोबाचा आजोबा




दिसायला होता
खुजोबा केवढा ?
बिल्कूल बाळूच्या
फुटपट्टीएवढा

खुजोबा खूप
गमती करायचा
कपड्यांच्या कपाटात
अलगद शिरायचा

लपंडाव खेळताना
पिशवीत लपे
कधि कधि पिठाच्या
डब्यातून निघे

खुजोबाला कापड
लागायचं नाही फार
फुटभर कापडात
चड्डया चार

गल्लीतला खुजोबा
दिल्लीला जाई
कारण तिकीट त्याला कधि
लागायचं नाही

# हसुबाई

एक होती हसुबाई
रुसुबाईची सासुबाई

हसुबाई नेहमी हसत राही
हसुबाईचा वेळ हसण्यात जाई

हसुबाईची सदा खुललेली कळी
हसुबाईला हसू आवरेना मुळी

येता जाता हसुबाई हसे
हसुबाई घरात हसत बसे

झोपेतसुद्धा हसत राही
हसत हसत स्वप्न पाही

हसुबाई हसे फुलांसंगे
हसत खेळे मुलांसंगे

हसुबाई हसत म्हणते गाणे
बाळही हसतो गोजिरवाणे



# जवान वाघोबा

वाघोबा दरीतून
वरती आले
सैन्यात जाऊन
भरती झाले

पाहून तिथली
सगळी फौज
वाघोबाला
वाटली मौज

त्याला मिळाले
कपडे छान
कपडे घालून
झाला जवान



बूट घालून
ऐटीत गेला
कॅप्टनला त्याने
सॅल्यूट केला

वाघोबा म्हणाले
कॅप्टनला,
" बंदूक मुळी
नको मला


नखे माझी
धारदार
शत्रूवरती
करीन वार

एकेकाचे
फोडीन नरडे
आणि उपसून
काढीन आतडे "

# रडणारी माती



दुपारच्या उन्हात
रडत बसली माती
तिकडून एक छानशी
परी जात होती
परी म्हणाली, " मातीताई
रडते का ग अशी ?
मारले का कुणी तुला
की आहेस उपाशी ? "
माती म्हणाली, " तसं नाही
ऊन लागतं फार
शाल हवी पांघरायला
पंधराशे वार ! "
परी आली आभाळात
पाडला खूप पाऊस
आनंदित झाली माती
फिटली तिची हौस
खुदुखुदु हसत बसली
गालात मग खुशाल
मऊ मऊ गवताची
पांघरून हिरवी शाल



# आळशी तुळशी

एक होती तुळशी
भलतीच आळशी
तुळशीला म्हणायचे
सारेजण कळशी

तुळशी सकाळी
उशीरा उठायची
ती शाळेत जायची
तेंव्हा शाळा सुटायची

तुळशीला अभ्यासाचा
भारी कंटाळा
परीक्षेत हमखास
मिळे भोपळा

जेवायला लागे तिला
साखर आणि तूप
तुळशीला आवडायचे
झोपायला खूप



वेड्यांचा बाजार

वेडगावला भरला
वेड्यांचा बाजार
बाजाराला आले
वेडे हजार

दुकानदार वेडे
गिऱ्हाईक वेडे
वेड्यांनी आणले
विकायला पेढे

गिऱ्हाईक म्हणाले,
" सांगा भाव ! "
दुकानदार म्हणाला,
" ऐका राव,

येतील ज्याला
बेचे पाढे
बे एके बे, बे दुणे चार
बे त्रिक सहा, बे चोक आठ
तोंडी पाठ

येतील ज्याला
बेचे पाढे
मिळतील त्याला
किलोभर पेढे ! "

गिऱ्हाइकाला आला
भलताच राग
म्हणाला, " इतके का
पेढे महाग ! "

# सोनीचा अभ्यास

बाबांच्या धाकाने
सोनी अभ्यास करते
अभ्यास कसला अभ्यासाचं
नाटकच ती करते

डोळ्यात झोप तरीही
पुस्तकाकडे बघते
थोड्या थोड्या वेळाने
डुलक्या घेत राहते

मराठीच्या पुस्तकातून
गणित असते सोडवत
गणिताच्या पुस्तकातील
कविता बसते म्हणत

भूगोलात भेटतो तिला
औरंगजेब बादशहा
इतिहासात विषुववृत्तावर
पाऊस पडतो बारमहा



भेटतात this that
हिन्दीच्या पुस्तकात
सायन्समध्ये वाचते ती
“ कौन किससे करे बात ! ”


# गावात आला हत्ती

गावात आला हत्ती म्हणून
खुश झाली मुले
रुबाबात चाले हत्ती
रुबाबात झुले

मुलांनी हत्तीला
खूप खूप चिडवलं
हत्तीने त्यांच्यावर
रागावून पाणी उडवलं

हत्ती चालू लागला तेव्हा
मुले ओरडली जोराने
हत्तीला काडी टोचली
एका खोडकर पोराने

चिडलेल्या हत्तीने
आपटली मग सोंड
तेव्हा मुलांना दिसले त्याचे
सोंडेखालचे तोंड



## आत्याबाई


आत्याबाई आमची
गमतीची गमतीची
गोष्ट सांगते जमतीची
गोष्ट सांगते वाघाची
वाघोबाच्या रागाची
कोल्होबाच्या फजितीची
गोष्टीमधला राजा शूर
जंगलात जातो दूर दूर
शिकार करतो सिंहाची
झाडे पक्षी. जिथे बोलती
पाण्यावरती लोक चालती
जादूगार अन् जादूची
गोष्ट सांगते चोरांची
वीरांची अन् थोरांची
आणि पऱ्यांच्या संगतीची
गोष्ट सांगते गब्बूची
किंवा ढ ढ ढब्बूची
अजब आगळ्या लोकांची



## गाढवपणा

नांद्गावच्या नदीत
घडू नये ते घडलं
गाढवाचं एक पोर
गळा काढून रडलं

गाढवाच्या पोराचा
बाप तिथं आला
पोरगं रडतं म्हणून
तोही रडू लागला



आई आली, ताई आली
काका आणि काकी
यायला उरला नाही
नातेवाईक बाकी

नातेवाईक येऊन सगळे
लागले तिथे रडू
प्रत्येकाच्या आवाजाला
आवाज लागे भिडू

आवाज एवढा वाढला
आभाळाला भिडला
ढगांवर आदळला तर
पाऊस खूप पडला

पाऊस खूप पडला आणि
नदीला आला पूर
तरीही गाढवे होती
रडण्यात चूर

पुराच्या पाण्याने
नदी भरून गेली
रडणारी गाढवे सगळी
पुरात वाहून मेली

# भागुबाई भित्री



एक होती भागुबाई
खूप खूप भित्री
आईच्याच कुशीमध्ये
झोपायची रात्री

उंदीरमामाला भागुबाई
घाबरायची खूप
आईच्या पदराआडून
माकडाला म्हणे, " हूप ! "

झुरळ आणि मुंगीची
भीती तिला वाटे
कुत्रा आणि मांजर पाहून
धूम पळत सुटे

चोरांची गोष्ट ती
ऐकायची नाही
प्लॅस्टिकचा साप पाहून
ओरडायची, " आ ऽऽ ई ! "


वाघ आणि सिंहाचे
नाव ऐकून रडे ती
राक्षसाचे चित्र पाहून
धाड्दिशी पडे ती

# हिरवे – हिरवे

हिरवे डोंगर
हिरवी झाडी
हिरवेच सारे मळे
हिरव्या हिरव्या
रानामधुनि
झरा निळा झुळझुळे

हिरवे राघू
हिरव्या मैना
हिरवळ हिरवी हसे
हिरव्या हिरव्या
गवतामधुनि
दडून बसती ससे

वाटा हिरव्या
घाटही हिरवे
हिरवी बांबुबने
हिरव्या हिरव्या
आनंदाने
हिरवी झाली मने



## गाणं

एक गाणं
परीचं
एक गाणं
पोरीचं
एक गाणं
खारीचं
एक चंद्र–
कोरीचं

एक गाणं
गाऊया
चांदण्यात
न्हाउया
फुलात गाणं
वाचू या
गाण्यासंगे
नाचू या

गाणं गाणं
गंमतीचं
गंमतीचं अन्
जमतीचं
आभाळाच्या
किमतीचं



BVBK-0401157

म. ग्रं. सं. ठाणें, वाचनालय शाखा:
बाल वाङ्मय विभाग.
दा. क्र. ..११५५. दिनांक .......
विषय बा. वा... क्र. ..५९८